# परिशिष्ट – २

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा – २००५,
बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा
हक्क अधिनियम २००९ व महाराष्ट्र राज्य
अभ्यासक्रम आराखडा २०१० नुसार इ. १ली
ते ८ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार
सुधारित विषयरचनेस मान्यता देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : पीआरई १२१२/(६/१२)/प्राशि–५,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२.**
**दिनांक : २० जून, २०१२.**

**संदर्भ – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे क्र. मराशैसंप्रप/अविवि/विषय योजना/२०१२/१०४२, दि. २४ एप्रिल, २०१२ चे पत्र.**

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ व महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० नुसार इयत्ता १ ली ते ८ वीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार सुधारित विषयरचनेस मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ व महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० नुसार इयत्ता १ ली ते ८ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' प्रमाणे सुधारित विषयरचनेस खालील बाबींचा समावेश करून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्राथमिक स्तरामध्ये इ.१ ली ते २ री करिता भाषा, गणित हे विषय राहतील. या दोन विषयांमध्ये परिसर अभ्यास हा विषय समाविष्ट असेल.

२) प्राथमिक स्तरामध्ये इ. ३ री ते ५ वी करिता मराठी, इंग्रजी, गणित, कार्यानुभव, कलाशिक्षण, शारीरिक शिक्षण हे विषय यापूर्वीच्या रचनेप्रमाणेच राहतील. तथापि, सामान्य विज्ञान, नागरिक शास्त्र व भूगोल हे विषय एकत्रितरीत्या परिसर अभ्यास भाग–१ मध्ये समाविष्ट राहतील. परिसर भाग–१ मध्ये इ. ३री चा भूगोल विषयाचा पाठ्यांश हा संबंधित जिल्ह्याशी निगडित राहील.
इतिहास हा विषय परिसर अभ्यास भाग–२ मध्ये स्वतंत्र राहील. इयत्ता ४ थी च्या इतिहासात कोणताही बदल असणार नाही.

३) इयत्ता ५ वी च्या वर्गासाठी असणारा हिंदी विषय यापुढेही सुरू राहील.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२०६२०१०२०२४०५०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सोबत प्रपत्र – अ

(ना. ऊ. रौराळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम इयत्ता १ ली ते ८ वी

## विषय योजना

| इयत्ता | मान्य विषय योजना (माध्यमनिहाय) | | | |
|---|---|---|---|---|
| | मराठी | इंग्रजी | हिंदी | गुजराती, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगू |
| इयत्ता १ ली व २ री | १) मराठी<br>२) इंग्रजी (अनिवार्य)<br>३) गणित<br>४) कार्यानुभव<br>५) कला शिक्षण<br>६) शारीरिक शिक्षण | १) इंग्रजी<br>२) मराठी (अनिवार्य)<br>३) गणित<br>४) कार्यानुभव<br>५) कला शिक्षण<br>६) शारीरिक शिक्षण | १) हिंदी<br>२) मराठी (अनिवार्य)<br>३) इंग्रजी (अनिवार्य)<br>४) गणित<br>५) कार्यानुभव<br>६) कला शिक्षण<br>७) शारीरिक शिक्षण | १) मातृभाषा<br>२) मराठी (अनिवार्य)<br>३) इंग्रजी (अनिवार्य)<br>४) गणित<br>५) कार्यानुभव<br>६) कला शिक्षण<br>७) शारीरिक शिक्षण |
| इयत्ता ३ री व ४ थी | १) मराठी<br>२) इंग्रजी (अनिवार्य)<br>३) गणित<br>४) परिसर अभ्यास भाग–१ व २<br>५) कार्यानुभव<br>६) कला शिक्षण<br>७) शारीरिक शिक्षण | १) इंग्रजी<br>२) मराठी (अनिवार्य)<br>३) गणित<br>४) परिसर अभ्यास भाग–१ व २<br>५) कार्यानुभव<br>६) कला शिक्षण<br>७) शारीरिक शिक्षण | १) हिंदी<br>२) मराठी (अनिवार्य)<br>३) इंग्रजी (अनिवार्य)<br>४) गणित<br>५) परिसर अभ्यास भाग – १ व २<br>६) कार्यानुभव<br>७) कला शिक्षण<br>८) शारीरिक शिक्षण | १) मातृभाषा<br>२) मराठी (अनिवार्य)<br>३) इंग्रजी (अनिवार्य)<br>४) गणित<br>५) परिसर अभ्यास भाग – १ व २<br>६) कार्यानुभव<br>७) कला शिक्षण<br>८) शारीरिक शिक्षण |
| इयत्ता ५ वी | १) मराठी (प्रथम)<br>२) हिंदी (द्‌वितीय)<br>३) इंग्रजी (तृतीय/प्रथम)<br>४) परिसर अभ्यास भाग–१ व २<br>५) गणित<br>६) कार्यानुभव<br>७) कला शिक्षण<br>८) शारीरिक शिक्षण | १) इंग्रजी (प्रथम)<br>२) मराठी (द्‌वितीय/प्रथम)<br>३) हिंदी (तृतीय) किंवा हिंदी + मातृभाषा (गुजराती, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगू)<br>४) परिसर अभ्यास भाग–१ व २<br>५) गणित<br>६) कार्यानुभव<br>७) कला शिक्षण<br>८) शारीरिक शिक्षण | १) हिंदी (प्रथम)<br>२) मराठी (द्‌वितीय)<br>३) इंग्रजी (तृतीय)<br>४) परिसर अभ्यास भाग–१ व २<br>५) गणित<br>६) कार्यानुभव<br>७) कला शिक्षण<br>८) शारीरिक शिक्षण | १) मातृभाषा (प्रथम)<br>२) इंग्रजी (तृतीय)<br>३) मराठी (द्‌वितीय) } संयुक्त<br>४) हिंदी (द्‌वितीय) }<br>५) परिसर अभ्यास भाग – १ व २<br>६) गणित<br>७) कार्यानुभव<br>८) कला शिक्षण<br>९) शारीरिक शिक्षण |

<table>
<tr><th rowspan="2">इयत्ता</th><th colspan="4">मान्य विषय योजना (माध्यमनिहाय)</th></tr>
<tr><th>मराठी</th><th>इंग्रजी</th><th>हिंदी</th><th>गुजराती, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगू</th></tr>
<tr><td>इयत्ता ६ वी व ७ वी</td><td>१) मराठी (प्रथम)<br>२) हिंदी (द्‌वितीय)<br>३) इंग्रजी (तृतीय/प्रथम)<br>४) सामान्य विज्ञान<br>५) गणित<br>६) सामाजिक शास्त्रे (इतिहास– नागरिक शास्त्र, भूगोल)<br>७) कार्यानुभव<br>८) कला शिक्षण<br>९) शारीरिक शिक्षण</td><td>१) इंग्रजी (प्रथम)<br>२) मराठी (द्‌वितीय किंवा प्रथम)<br>३) हिंदी (तृतीय) किंवा हिंदी + मातृभाषा (गुजराती, उर्दू, कन्नड, सिंधी, कन्नड, तेलुगू)<br>४) सामान्य विज्ञान<br>५) गणित<br>६) सामाजिक शास्त्रे (इतिहास– नागरिक शास्त्र, भूगोल)<br>७) कार्यानुभव<br>८) कला शिक्षण<br>९) शारीरिक शिक्षण</td><td>१) हिंदी (प्रथम)<br>२) इंग्रजी (तृतीय)<br>३) मराठी (द्‌वितीय)<br>४) सामान्य विज्ञान<br>५) गणित<br>६) सामाजिक शास्त्रे (इतिहास– नागरिक शास्त्र, भूगोल)<br>७) कार्यानुभव<br>८) कला शिक्षण<br>९) शारीरिक शिक्षण</td><td>१) मातृभाषा (प्रथम)<br>२) इंग्रजी (तृतीय)<br>३) मराठी (द्‌वितीय) ] संयुक्त<br>४) हिंदी (द्‌वितीय) ]<br>५) सामान्य विज्ञान<br>६) गणित<br>७) सामाजिक शास्त्रे (इतिहास– नागरिक शास्त्र, भूगोल)<br>८) कार्यानुभव<br>९) कला शिक्षण<br>१०) शारीरिक शिक्षण</td></tr>
<tr><td>इयत्ता ८ वी</td><td>१) मराठी (प्रथम)<br>२) इंग्रजी (तृतीय/प्रथम)<br>३) हिंदी (द्‌वितीय) किंवा संस्कृत किंवा पाली किंवा अर्धमागधी किंवा हिंदी–संस्कृत किंवा हिंदी–पाली, हिंदी–अर्धमागधी किंवा हिंदी–उर्दू किंवा हिंदी–पर्शियन किंवा हिंदी–अरेबिक<br>उर्दू मातृभाषा असलेल्या विद्‌यार्थ्यांसाठी<br>१. अ) मराठी (प्रथम)<br>ब) इंग्रजी तृतीय किंवा प्रथम</td><td>१) इंग्रजी (प्रथम)<br>२) मराठी (द्‌वितीय/प्रथम)<br>३) हिंदी (तृतीय) किंवा हिंदी–संस्कृत किंवा हिंदी–पाली किंवा हिंदी–अर्धमागधी किंवा हिंदी–फ्रेंच किंवा हिंदी–जर्मन किंवा हिंदी–रशियन किंवा हिंदी–गुजराती किंवा हिंदी–कन्नड किंवा हिंदी–तमिळ किंवा हिंदी–तेलुगू किंवा हिंदी–सिंधी किंवा हिंदी–उर्दू किंवा हिंदी–पर्शियन किंवा हिंदी–अरेबिक किंवा गुजराती किंवा संस्कृत</td><td>१) हिंदी (प्रथम)<br>२) इंग्रजी (तृतीय)<br>३) मराठी (द्‌वितीय) किंवा मराठी–संस्कृत किंवा मराठी–अर्धमागधी किंवा मराठी–पाली किंवा मराठी–फ्रेंच किंवा मराठी–जर्मन किंवा मराठी–रशियन किंवा मराठी–उर्दू किंवा मराठी–अरेबिक किंवा मराठी–पर्शियन</td><td>१) मातृभाषा (प्रथम)<br>२) इंग्रजी (तृतीय)<br>३) मराठी (द्‌वितीय) किंवा मराठी–हिंदी किवा मराठी–संस्कृत किंवा मराठी–पाली किंवा मराठी – अर्धमागधी किंवा मराठी–उर्दू किंवा मराठी–अरेबिक किंवा मराठी–पर्शियन</td></tr>
</table>

| इयत्ता | मान्य विषय योजना (माध्यमनिहाय) | | | |
|---|---|---|---|---|
| | मराठी | इंग्रजी | हिंदी | गुजराती, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगू |
| | क) हिंदी (द्वितीय) किंवा हिंदी–उर्दू किंवा हिंदी–पर्शियन किंवा हिंदी–अरेबिक किंवा उर्दू–पर्शियन किंवा उर्दू–अरेबिक<br>२. अ) उर्दू (प्रथम)<br>ब) इंग्रजी (तृतीय किंवा प्रथम)<br>क) मराठी (द्वितीय) किंवा मराठी–हिंदी किंवा मराठी–संस्कृत किंवा मराठी–पाली किंवा मराठी–अर्धमागधी किंवा मराठी–पर्शियन किंवा मराठी–अरेबिक | | | |
| | ४) सामान्य विज्ञान | ४) सामान्य विज्ञान | ४) सामान्य विज्ञान | ४) सामान्य विज्ञान |
| | ५) गणित | ५) गणित | ५) गणित | ५) गणित |
| | ६) सामाजिक शास्त्रे (इतिहास–नागरिक शास्त्र, भूगोल) | ६) सामाजिक शास्त्रे (इतिहास–नागरिक शास्त्र, भूगोल) | ६) सामाजिक शास्त्रे (इतिहास–नागरिक शास्त्र, भूगोल) | ६) सामाजिक शास्त्रे (इतिहास–नागरिक शास्त्र, भूगोल) |
| | ७) कार्यानुभव | ७) कार्यानुभव | ७) कार्यानुभव | ७) कार्यानुभव |
| | ८) कला शिक्षण | ८) कला शिक्षण | ८) कला शिक्षण | ८) कला शिक्षण |
| | ९) शारीरिक शिक्षण | ९) शारीरिक शिक्षण | ९) शारीरिक शिक्षण | ९) शारीरिक शिक्षण |

**इयत्ता पहिली ते आठवी – पर्यावरण शिक्षण हा विषय एकात्मिक पद्धतीने सर्व विषयांत समाविष्ट करण्यात येईल.**

# परिशिष्ट - ३

**सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून**
**इ. १ ली ते ८ वी साठी (प्राथमिक स्तर)**
**सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पीआरई/२०१०/(१३६/१०)/प्राशि-५**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२**
**दिनांक : २० ऑगस्ट, २०१०.**

**वाचा -**

**१) शासन निर्णय क्र. सुप्राअ २००३/(१२१/२००३)/प्राशि-५, दि. ३१ ऑगस्ट २००४.**
**२) शासन परिपत्रक क्र. विकाक-२००९.(प्र.क्र. २९२)/प्राशि-१, दि. १० मे २०१०.**
**३) शासन निर्णय क्र. पीआरई २०१०/(प्र.क्र. २१५)/प्राशि-१, दि. ११ जून, २०१०.**
**४) शासन निर्णय क्र. पीआरई २०१०/(प्र. क्र. २९१)/प्राशि-१, दि. १६ जून, २०१०.**
**५) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९.**

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सन २००६-०७ पासून सुरू असून नवीन अभ्यासक्रमाबरोबरच इयत्ता पहिली ते आठवीच्या (प्राथमिक स्तर) विद्यार्थ्यांसाठी दिनांक ३१ ऑगस्ट, २००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मूल्यमापनपद्धती विहित करण्यात आली होती.

१. केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अे) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, [Right of Children to Free and Compulsory Education. ACT 2009 (No. 35. 2009)] केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या २७/०८/२००९ च्या राजपत्रात प्रसिद्ध केला आहे. तसेच भारत सरकारच्या दिनांक १६/०२/२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक ०१-०४-२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मीर वगळता) लागू केला असल्याचे नमूद केले आहे.

२. समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जाऊ शकतात. यादृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना

शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.

३. संदर्भाधीन दिनांक १६ जून, २०१० च्या शासन निर्णयान्वये इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देणे व त्यांची संपादणूक पातळी वाढविण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर अधिनियमातील कलम २९ (१) व (२) नुसार इयत्ता पहिली ते आठवीसाठी **सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती** लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय

शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. विकाक–२००९/प्र.क्र.२९२/प्राशि–१, दि. १० मे, २०१० अन्वये बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, दिनांक १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला आहे. त्यानुसार इयत्ता आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना कोणत्याही बोर्डाची परीक्षा द्यावी लागणार नाही. सदर अधिनियमामधील कलम २९ (१) व (२) नुसार सन २०१०–२०११ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते आठवीसाठी पुढीलप्रमाणे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे.

## सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा हेतू

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या सर्व पैलूंचे सातत्याने आणि विविध अंगांनी मूल्यमापन करण्यासाठी वापरावयाची शाळास्तरावरील कार्यपद्धती म्हणजे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन होय.

त्यामध्ये दोन प्रकारच्या उद्‌दिष्टांवर भर देणे आवश्यक आहे. त्यापैकी पहिले उद्‌दिष्ट विद्यार्थ्यांच्या व्यापक अध्ययनप्रक्रियेचे सातत्यपूर्ण मूल्यमापन (Continuity in Evaluation and Assessment of Broad based Learning) आणि दुसरे उद्‌दिष्ट **वर्तनातील दृश्यरूप किंवा वर्तन निष्पत्ती (Behavioural Outcomes).**

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये आकारिक मूल्यमापन आणि संकलित मूल्यमापन पद्धतींचा समावेश राहील.

## कार्यपद्धती –

### (अ) आकारिक मूल्यमापन (Formative Evaluation)

**(विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आकार घेत असताना नियमितपणे करावयाचे मूल्यमापन)**

सर्व शिक्षकांनी पुढील साधने–तंत्रे उपयोगात आणून वर्गपातळीवर विद्यार्थ्यांचे आकारिक मूल्यमापन करावे आणि प्रत्येक विद्यार्थ्यांच्या त्यासंबंधीच्या आवश्यक नोंदी ठेवाव्यात.

१) दैनंदिन निरीक्षण.
२) तोंडी काम (प्रश्नोत्तरे, प्रकट वाचन, भाषण–संभाषण, भूमिकाभिनय, मुलाखत, गटचर्चा इत्यादी)
३) प्रात्यक्षिके/प्रयोग.

४) उपक्रम/कृती (वैयक्तिक, गटात, स्वयं–अध्ययनाद्वारे)
५) प्रकल्प
६) चाचणी (वेळापत्रक जाहीर न करता अनौपचारिक स्वरूपात घ्यावयाची छोट्या कालावधीची लेखी चाचणी/पुस्तकासह चाचणी (Open book Test)
७) स्वाध्याय/वर्गकार्य (माहितीलेखन, वर्णनलेखन, निबंधलेखन, अहवाललेखन, कथालेखन, पत्रलेखन, संवादलेखन व कल्पनाविस्तार इत्यादी)
८) इतर : प्रश्नावली, सहाध्यायी मूल्यमापन, स्वयंमूल्यमापन, गटकार्य अशा प्रकारची अन्य साधने

आकारिक मूल्यमापनात वरील मूल्यमापनाची साधने–तंत्रे यांपैकी इयत्ता, विषय आणि उद्‌दिष्टे विचारात घेऊन अधिकाधिक साधन–तंत्रांचा वापर करावा. यात किमान पाच साधने–तंत्रे यांचा वापर करावा. कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण व आरोग्य या विषयांसाठी किमान तीन साधने–तंत्रे यांचा वापर करावा. प्रत्येक साधन–तंत्रास योग्य भारांश द्यावा. तसेच विद्यार्थी वर्षभरात किमान एक प्रकल्प करतील असे पाहावे. प्रत्येक सत्रात किमान एक छोट्या कालावधीची लेखी चाचणी/पुस्तकासह लेखी चाचणी (Open book Test) घ्यावी. विद्यार्थी, विषय आणि उद्‌दिष्टे इत्यादींनुसार उपरोक्त साधन–तंत्रांच्या उपयोगाबाबत आकारिक मूल्यमापनात लवचीकता राहील.

**(ब) संकलित मूल्यमापन (Summative Evaluation)**

**(ठरावीक काळानंतर एकत्रित स्वरूपात करावयाचे मूल्यमापन)**

प्रथम सत्राच्या अखेरीस पहिले संकलित मूल्यमापन करावे. द्‌वितीय सत्राच्या अखेरीस दुसरे संकलित मूल्यमापन करण्यात यावे. संकलित मूल्यमापनात विषयांच्या उद्‌दिष्टांनुसार **लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक** प्रश्नांचा समावेश करावा.

**आकारिक आणि संकलित मूल्यमापनाचा भारांश पुढीलप्रमाणे राहील.**

**आकारिक व संकलित मूल्यमापन भारांश : प्रत्येक सत्रासाठी व प्रत्येक विषयासाठी**

**(कला, कार्यानुभव आणि शारीरिक शिक्षण व आरोग्य हे विषय वगळून)**

| इयत्ता | आकारिक मूल्यमापन | संकलित मूल्यमापन | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | तोंडी /प्रात्यक्षिक | लेखी | |
| पहिली व दुसरी | ७०% | १०% | २०% | १००% |
| तिसरी व चौथी | ६०% | १०% | ३०% | १००% |
| पाचवी व सहावी | ५०% | १०% | ४०% | १००% |
| सातवी व आठवी | ४०% | १०% | ५०% | १००% |

प्रपत्र–अ मध्ये वरील भारांशानुसार तक्ता दिला आहे.

## सर्वसाधारण सूचना

मूल्यमापन हे अध्ययन–अध्यापन प्रक्रियेचे एक अविभाज्य अंग असल्याने आनंददायी अध्ययनाबरोबर मूल्यमापनदेखील आनंददायी असावे. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन पूर्णपणे वर्ग/शाळा पातळीवरच गांभीर्याने करण्यात यावे. मूल्यमापन हे उद्दिष्टानुवर्ती असावे आणि ते वर्षभर सातत्याने करावे.

**आकारिक मूल्यमापनासाठी सूचना**

### १. आकारिक मूल्यमापन :–

**विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक, भावनिक असा सर्वांगीण विकास** होऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे आकाराला येत आहे हे नियमितपणे पडताळून पाहणे म्हणजेच आकारिक मूल्यमापन. शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये आकारिक मूल्यमापनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याचे आकारिक मूल्यमापन गांभीर्याने करणे आवश्यक आहे.

**१.१** आकारिक मूल्यमापन करण्यासाठी आठ साधने–तंत्रे वापरून केलेल्या मूल्यमापनामधील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद / सहभाग विचारात घ्यावा. मूल्यमापनाचा विचार **जीवन कौशल्यांच्या** अंगाने करावा. विद्यार्थ्यांची **जिज्ञासा, शोधक वृत्ती, चिकित्सक वृत्ती, सर्जनशील विचार** करण्याची क्षमता, **संवेदनशीलता,** विद्यार्थ्यांचे परस्परांशी असलेले संबंध, सहज **संवाद साधण्याची क्षमता, ताणतणावांना तोंड देण्याची भावनिक ताकद** या सर्व गोष्टींची दखल घ्यावी. ही सर्व कौशल्ये विद्यार्थ्यांच्या वर्तनात दृश्य स्वरूपात येण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांशी वेळोवेळी सुसंवाद साधावा. **त्यामुळे शिक्षणप्रक्रिया उद्दिष्टांनुरूप व जीवनाभिमुख होण्यास मदत होईल.**

**१.२** आकारिक मूल्यमापनामधून संविधानातील मूल्ये, गाभाघटक व जीवन कौशल्ये यांचे मूल्यमापन व्हावे.

**१.३** प्रत्येक सत्रातील आकारिक मूल्यमापनामध्ये सातत्य राहावे. वरील आकारिक मूल्यमापनाच्या आठ साधन–तंत्रांपैकी विषय व उद्दिष्टांनुसार उपयुक्त मूल्यमापन साधनांद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात यावे.

**१.४** कला, कार्यानुभव आणि शारीरिक शिक्षण व आरोग्य या विषयांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. शिक्षणप्रक्रिया जीवनाशी जोडली जाते व मूल्यांचा परिपोष होतो. त्यामुळे या विषयांचे मूल्यमापन योग्य प्रकारे करून विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन द्यावे.

**१.५** आकारिक मूल्यमापन करताना शिक्षकांच्या मार्गदर्शनातील उणिवा आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी दूर होऊन विद्यार्थ्यांचे मूलभूत संबोध (Concepts) व कौशल्ये दृढ होण्यासाठी योग्य ते नियोजन करून कृती करावी.

**१.६** प्रत्येक व्यक्तीमध्ये विविध स्वरूपाच्या सुप्त क्षमता असतात. त्या सुप्त क्षमतांचा शोध घेण्यासाठी व त्यांचा विकास साधण्यासाठी विविध अध्ययन अनुभव व उपक्रम योजावेत. त्यांतून साधल्या जाणाऱ्या व्यक्तिमत्त्वविकासाचे वेळोवेळी मूल्यमापन करावे.

**१.७** **अतिरिक्त पूरक मार्गदर्शन –** आकारिक मूल्यमापन करताना जे विद्यार्थी संपादणुकीमध्ये मागे असल्याचे आढळून येईल अशा विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी/त्रुटींचा शोध घ्यावा व त्यानुसार **वेळच्या वेळी** विद्यार्थ्यांना वैयक्तिक अथवा गटात **अतिरिक्त पूरक मार्गदर्शन** करून त्यांना अपेक्षित संपादणूक पातळीपर्यंत आणावे.

## २. संकलित मूल्यमापन :-

संकलित मूल्यमापन प्रथम व द्‌वितीय सत्राच्या अखेरीस **लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक** स्वरूपात करण्यात यावे. लेखी स्वरूपातील साधनांमध्ये मुक्तोत्तरी प्रश्नांचा (Open ended questions) अधिक वापर करण्यात यावा. संविधानातील मूल्ये, गाभाघटक, जीवन कौशल्ये व दूरगामी उद्‌दिष्टे या संदर्भातील मूल्यमापन होण्याच्या दृष्टीने विचार करण्यात यावा.

**२.१** पहिले संकलित मूल्यमापन प्रथम सत्राच्या अखेरीस व दुसरे संकलित मूल्यमापन द्‌वितीय सत्राच्या अखेरीस तोंडी प्रात्यक्षिक वर्ग स्तरावर/शाळा स्तरावर शिक्षक व मुख्याध्यापक यांनी ठरवून करावे.

**२.२** संपूर्ण शिक्षणप्रक्रियाच आनंददायी असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला आपली मते मुक्तपणे व सहजतेने देता येतील/व्यक्त करता येतील अशा रीतीने मूल्यमापन करावे. मूल्यमापनामुळे मुलांना भीती, दडपण वाटणार नाही याची दक्षता घ्यावी.

**२.३** प्रत्येक शिक्षकाने मूल्यमापन करण्यासाठी विषयांची उद्‌दिष्टे पाहावीत व त्यानुसार मूल्यमापनाची कार्यपद्धती ठरवावी.

**२.४** विहित विषयांचे ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्ये, अभिरुची, अभिवृत्ती, रसग्रहण इत्यादी उद्‌दिष्टांचे मूल्यमापन करण्यापूर्वी त्या विषयीचा वर्गात आवश्यक तो पुरेसा सराव घ्यावा.

**२.५** संकलित मूल्यमापनासाठी प्रश्न तयार करताना सर्व उद्‌दिष्टांना योग्य प्रमाणात भारांश द्यावा. तसेच वस्तुनिष्ठ, लघुत्तरी व दीर्घोत्तरी प्रश्नांसाठी इयत्तानिहाय योग्य प्रमाणात भारांश निश्चित करावा. इयत्ता पहिली-दुसरीसाठी व इयत्ता तिसरी-चौथीसाठी वस्तुनिष्ठ व लघुत्तरी प्रश्न अधिक असावेत. इयत्ता पाचवी ते आठवीसाठी वस्तुनिष्ठ, लघुत्तरी व दीर्घोत्तरी प्रश्नांसाठी अनुक्रमे सर्वसाधारणपणे २०%, ६०% व २०% भारांश असावा.

**२.६** **प्रत्येक शाळेतील त्या त्या वर्गाना शिकविणाऱ्या शिक्षकांनी विषयनिहाय, वर्गनिहाय संकलित मूल्यमापन करावे. कोणत्याही अन्य यंत्रणेकडून तयार करण्यात आलेली मूल्यमापनाची साधने-तंत्रे आणि प्रश्नपत्रिका वापरल्या जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.**

**२.७** संकलित मूल्यमापनासाठी साधने तयार करताना विद्यार्थ्यांची चिकित्सक वृत्ती, सर्जनशीलता आणि बहुविध बुद्‌धिमत्तेला (Multiple intelligence) वाव ठेवावा. त्यासाठी आवश्यकतेनुसार मुक्तोत्तरी प्रश्नांचा (Open Ended Questions) उपयोग करावा. यांत्रिक प्रतिसाद, घोकंपट्टी यावर भर देणाऱ्या आणि स्मरणावर आधारित प्रश्नांना वाव देऊ नये.

**२.८** संकलित मूल्यमापनाचे वेळापत्रक वर्ग/शाळा पातळीवर निश्चित करावे. मूल्यमापन करताना वेळेबाबत लवचीकता ठेवावी.

**२.९** मूल्यमापनातून निदर्शनास आलेल्या उल्लेखनीय बाबी तसेच वैयक्तिक गुणांची आवर्जून दखल घ्यावी आणि विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन अशा गुणांच्या विकासासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

**२.१०** **अतिरिक्त पूरक मार्गदर्शन -** संकलित मूल्यमापन करताना जे विद्यार्थी संपादणुकीमध्ये मागे असल्याचे आढळून येईल अशा विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी/त्रुटींचा शोध घ्यावा व त्यानुसार **वेळच्यावेळी** विद्यार्थ्यांना वैयक्तिक अथवा गटात **अतिरिक्त पूरक मार्गदर्शन** करून त्यांना अपेक्षित संपादणूक पातळीपर्यंत आणावे.

**श्रेणी पद्धतीचा वापर**

विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रगतिपत्रकात विद्यार्थ्यांची विषयवार संपादणूक त्यांनी प्राप्त केलेल्या गुणांवरून खालील कोष्टकात दर्शविल्यानुसार श्रेणीमध्ये लिहावी. सर्व विषयांची सरासरी काढून संकलित श्रेणी नोंदवू नये.

| **गुणांचे वर्गांतर** | **श्रेणी** |
|---|---|
| ९१% ते १००% | अ–१ |
| ८१% ते ९०% | अ–२ |
| ७१% ते ८०% | ब–१ |
| ६१% ते ७०% | ब–२ |
| ५१% ते ६०% | क–१ |
| ४१% ते ५०% | क–२ |
| ३३% ते ४०% | ड |
| २१% ते ३२% | इ–१ |
| २०% व त्यापेक्षा कमी | इ–२ |

* विद्यार्थ्यांच्या प्रगतिपत्रकात शैक्षणिक प्रगतीचे वर्णनात्मक फलित नोंदवावे. तसेच त्यामध्ये वैयक्तिक गुणांची (Quality) नोंद करावी. मूल्यमापन करताना सकारात्मक शेऱ्यांचा वापर करावा. तसेच इतर विद्यार्थ्यांशी तुलना करू नये. पालकांना मुलांच्या प्रगतीबाबत वेळच्यावेळी माहिती द्यावी.
* जे विद्यार्थी मूल्यमापनाच्यावेळी अनुपस्थित राहतील त्यांचे पुन्हा मूल्यमापन करण्यात यावे.
* सर्व विद्यार्थी वरच्या श्रेणीकडे वाटचाल करतील यासाठी शाळा व शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे. विशेष करून **'ड' व त्याखालील श्रेणींतील विद्यार्थ्यांना** अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करून **किमान 'क २'** श्रेणीपर्यंत आणणे हे शाळा व शिक्षकांवर बंधनकारक राहील. मात्र **अशा विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत त्याच इयत्तेत ठेवता येणार नाही.**

वरील मूल्यमापन कार्यपद्धती महाराष्ट्र राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या मान्यताप्राप्त शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांतील इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना लागू राहील.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक 2010082019134801 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ना. ऊ. रौराळे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

# परिशिष्ट – ४

**शैक्षणिक वर्षामधील कामाचे किमान दिवस, शिक्षणाचे तास व शिक्षकांसाठी प्रत्येक आठवड्याला किमान तास निश्चित करणे.**

## महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पीआरई/२०१०/प्र.क्र.११४/प्राशि-१**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२**
**दिनांक : २९ एप्रिल, २०११.**

**वाचा :** १) बालकांचा–मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, – २००९

२) मुंबई प्राथमिक शिक्षा नियम, १९४९, नियम क्र. १२५

**प्रस्तावना –** केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान–विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (ए) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (No. 35, 2009), केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या २७/८/२००९ च्या राजपत्रात प्रसिद्ध केला आहे. तसेच, भारत सरकारच्या दिनांक १६/२/२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक १/४/२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मीर वगळता) लागू केला असल्याचे नमूद केले आहे.

२) समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये, सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जाऊ शकतात, यादृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.

३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील प्रकरण ४, कलम १९ व २५ अन्वये प्राथमिक शाळेसाठी असलेली मानके व निकष यांची पूर्तता करण्यासाठी शासन निर्णय दि. १ मार्च २०११ रोजी निर्गमित केले आहे. तथापि त्यात सुधारणा करण्यासाठी निवेदने प्राप्त झाली. त्यामुळे काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय : शैक्षणिक वर्षामधील कामाचे किमान दिवस, शिक्षणाचे तास व शिक्षकांसाठी प्रत्येक आठवड्याला किमान तास निश्चित करणे,** याबाबतचा शासन निर्णय शासन, शालेय निर्णय शासन, शालेय शिक्षण

व क्रीडा विभाग क्र. पी.आर.ई. २०१०/प्रक्र. ११४/प्राशि–१ दि. १ मार्च २०११ अधिक्रमित करून शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील प्रकरण ४, कलम १९ (ए) अन्वये अधिनियमातील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यांनुसार प्रत्येक शिक्षकासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षामधील शिक्षकांच्या कामाचे किमान दिवस व शिक्षणाचे तास तसेच शिक्षकांसाठी प्रत्येक आठवड्याला शाळेतील कामाचे तास व शाळेबाहेरील चिंतन व अभ्यासाचे तास खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

अ) इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गांसाठी शैक्षणिक वर्षातील शाळेतील शिक्षकांचे कामाचे दिवस किमान २०० इतके राहतील.

ब) इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गांसाठी शैक्षणिक वर्षांत शिक्षकांचे कामाचे दिवस किमान २२० इतके राहतील.

क) इयत्ता पहिली ते पाचवी वर्गांसाठी शैक्षणिक वर्षातील अध्यापनाचे किमान घड्याळी तास ८०० इतके राहतील.

ड) इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गांसाठी शैक्षणिक वर्षांतील अध्यापनाचे किमान घड्याळी तास १००० इतके राहतील.

इ) प्रत्येक शिक्षकासाठी प्रत्येक आठवड्याला पाठाची तयारी करण्यासह अध्यापनाचे किमान ४५ तास इतके राहतील. यात शाळेबाहेरील चिंतन व अभ्यासक्रमाच्या तयारीसाठी १५ तास व प्रत्यक्ष शाळेतील शिकविण्याचे किमान ३० तासांचा समावेश असेल.

फ) पाठाची तयारी करण्यासाठी अध्यापनाचे ४५ तास याचा अर्थ शिक्षक किंवा विद्यार्थ्यांसाठी ८ तासांची शाळा असा होत नसून शिक्षक व विद्यार्थी यांच्या शाळेतील अध्यापन–अध्ययनासाठी पूर्वीप्रमाणेच ३० तास अपेक्षित राहतील. तसेच आठवड्यातून सहा दिवस किंवा पाच दिवस चालणाऱ्या शाळांची वेळ पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात या निर्णयाचा अडसर राहणार नाही.

**पाठाची तयारी, (म्हणजे शाळेबाहेरील चिंतन व अभ्यासाचे तास) पाठासाठी मुद्देनिहाय गोळा करावयाची माहिती वा साहित्य यासाठी स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :** अध्ययन–अध्यापन विषयक साहित्य तयार करणे, पाठाचे टाचण तयार करणे, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन विषयक  नोंदी, तंत्र विकसित करणे व प्रत्यक्ष मूल्यांकन करणे, मुलांना शिकविण्यासाठी चांगली ज्ञानयुक्त पुस्तके वाचणे, अभ्यासात मागे राहणाऱ्या मुलांची चांगली प्रगती करण्यासाठी चिंतन करणे, क्रमिक पुस्तकांच्या जोडीने संदर्भ पुस्तके वाचणे यासाठी (एकूण १५ तास) राहतील.

शैक्षणिक दृक्‌श्राव्य साधने इत्यादींच्या साहाय्याने दिग्दर्शित अध्यापन व स्वयंअध्ययन करून घेणे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११०४२९१३३९५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(झ. सा. रणदिवे)**
**अपर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, (सर्व)
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्यसचिव, यांचे स्वीय सहायक
मा. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक,
सर्व प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व आयुक्त, महानगरपालिका
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व विधान सभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ
सर्व विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई यांना (१० प्रतींसह)
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी, (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ) जिल्हा परिषद
सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपरिषद
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपरिषद/कटकमंडळे
शिक्षण निरीक्षक (दक्षिण/पश्चिम/उत्तर) बृहन्मुंबई. निवड नस्ती (प्राशि-१)

# परिशिष्ट – ५

**शालेय इंग्रजीसह अन्य मराठी माध्यमाच्या शाळांमधून मराठी (भाषा) विषय अध्यापन अनिवार्य करणेबाबत–**

## महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सुप्राअ २००६/(१६४/०६) / प्राशि–५**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२**
**दिनांक : ४ फेब्रुवारी, २००९.**

**संदर्भ :**
१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक सुप्राअ १०९९/(१८०/९९)/ प्राशि–५, दि. ३० डिसेंबर, १९९९
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक सुप्राअ २००४/(८/०४)/ प्राशि–५, दि. १० फेब्रुवारी, २००४,
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक सुप्राअ २००४/(९४/०४)/ प्राशि–५, दि. २१ ऑगस्ट, २००४,
४) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे पत्र, क्रमांक मराशैसंप्रप/ अविवि/भाषा/२००८–०९/५४०३, दिनांक ०५ ऑगस्ट, २००८

**प्रस्तावना –** शासन निर्णय, दिनांक ३० डिसेंबर, १९९९ अन्वये जून २००० पासून बिगर इंग्रजी माध्यमाच्या शाळांत इयत्ता १ ली पासून इंग्रजी हा विषय शिकविण्यात येत आहे. राज्याची राजभाषा मराठी असल्यामुळे व्यवहारात विद्यार्थ्यांना मराठी भाषेबाबत अडचणी येऊ नयेत, या दृष्टिकोनातून राज्यातील सर्व बिगर मराठी माध्यमाच्या शाळांमधून प्राथमिक स्तरांवर सक्तीने मराठी भाषा शिकविण्याची मागणी समाजाच्या विविध स्तरांवरून होत आहे. या संदर्भात राज्यस्तरीय अभ्यासक्रम समितीची शिफारस घेण्यात आली. विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांबाबत भविष्यात अडचणी होऊ नयेत, या दृष्टीने राज्यातील सर्व अमराठी माध्यमाच्या शाळांमधून इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या वर्गांमध्ये मराठी भाषा विषय अध्यापन अनिवार्य करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय –** महाराष्ट्र शासनाच्या प्रचलीत भाषासूत्रानुसार इंग्रजी व उर्दू माध्यमांच्या शाळांसह राज्यातील सर्व अमराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमधून मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या शैक्षणिक धोरणास बाधा न येता,

इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गांमधून टप्प्या–टप्प्याने सन २००९–२०१० या शैक्षणिक वर्षापासून खालील अटींच्या अधीन राहून मराठी भाषा अध्ययन अनिवार्य करण्यात येत आहे.

१) इंग्रजी, उर्दू माध्यमांसह अन्य सर्व अमराठी माध्यमाच्या शाळांमधून इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या वर्गांमध्ये मराठी भाषा विषयाचे अध्यापन करणे अनिवार्य राहील.

२) इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून इयत्ता १ ली ते ४ थी साठी इंग्रजी ही प्रथम भाषा तसेच एकमेव भाषा शिकविली जाते, त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून मराठी ही दुसरी भाषा म्हणून शिकविण्यात यावी.

३) मराठी भाषेचा अभ्यासक्रम भाषा कार्यगट सदस्यांच्या संमतीने निश्चित करण्यात येईल.

४) मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची निश्चिती करताना इयत्ता १ ली व २ री साठी श्रवण, भाषण व संभाषण ही कौशल्ये ठेवण्यात यावीत. तर इयत्ता ३ री व ४ थी साठी श्रवण, भाषण व संभाषण या कौशल्यांबरोबर वाचन व लेखन या कौशल्यांचाही समावेश करण्यात यावा.

५) **विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १ ली व २ री च्या वर्गांना पाठ्यपुस्तक असू नये. मात्र इयत्ता ३ री ते ४ थी च्या वर्गांना मर्यादित स्वरूपाचे स्वतंत्र पाठ्यपुस्तक असावे. शिक्षकांसाठी इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गांसाठी हस्तपुस्तिका / मार्गदर्शिका तयार करण्यात याव्यात.**

६) **मराठी भाषा विषयासाठी दर आठवड्याला दोन तासिका असाव्यात.**

७) **इयत्ता १ ली ते ४ थी साठी मराठी विषयाचे औपचारिक मूल्यमापन असणार नाही. तसेच विद्यार्थ्यांसाठी कोणतीही लेखी परीक्षा असू नये.**

८) राज्यातील डी.एड. पदविका अभ्यासक्रमात मराठी भाषा अनिवार्य असल्याने, अमराठी माध्यमाच्या शाळांमध्ये डी. एड. पदविका धारक शिक्षकांना मराठी भाषेचे ज्ञान असल्याने त्यांना विषयाच्या **नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी नवीन पद निर्मितीची आवश्यकता असणार नाही. विषयासाठी स्वतंत्र शिक्षकाची नियुक्ती करावयाची झाल्यास ती शाळेच्या मंजूर पदांतर्गत करण्यात यावी. यामुळे कोणतेही नवीन पद निर्माण करता येणार नाही.**

९) अमराठी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांची मातृभाषा **मराठी नसल्याने, त्यांना मराठी माध्यमाचा प्रचलित अभ्यासक्रम (इ. १ ली ते ४ थी) जसाचा तसा लागू न करता, अमराठी शाळांसाठी मराठी विषयाचा नवीन अभ्यासक्रम तयार करून मराठी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात यावे. नवीन विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना संबंधित संस्थेच्या विनंतीनुसार सर्व शिक्षा अभियान अंतर्गत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडून प्रशिक्षण देण्यात येईल.**

१०) वरीलप्रमाणे मराठी भाषा विषय अध्यापन अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे कडून तयार केला जाईल व अभ्यासक्रमावर आधारित शिक्षण साहित्य व पाठ्यपुस्तके महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती), पुणे कडून तयार केले जाईल. **अभ्यासक्रम**

**शिकविण्यास सुरुवात करावयाच्या शैक्षणिक वर्षाच्या माहे डिसेंबर अखेर पर्यंत संबंधित शैक्षणिक संस्थेने पाठ्यपुस्तक व शिक्षण साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे यांचेकडे मागणी नोंदविणे अनिवार्य राहील.**

११) विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे वाढणार नाही याची दक्षता घ्यावी.

हा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९०२०४१७१४०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्वाक्षरित**

**(ना. ऊ. रौराळे)**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

***

# परिशिष्ट - ६

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२
(इ. १ ली ते ८ वी) च्या मसुद्यास
मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पीआरई-१४११/(१७५/११)/प्राशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक : २८ डिसेंबर, २०१२

वाचा- १) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९,
२) शासन निर्णय क्र.पीआरई-२०११/प्र.क्र.११४/प्राशि-१, दि. १ मार्च, २०११,
३) शासन अधिसूचना क्र.पीआरई-२०१२/प्र.क्र.२१२(बी)/पीई-१, दि. ११ ऑक्टोबर, २०११,
४) शासन अधिसूचना क्र.पीआरई-१४११/(१७५/११)/प्राशि-५, दि. ७ मार्च, २०१२,
५) शासन निर्णय क्र.पीआरई-१२१२/(६/१२)/प्राशि-५, दि. २० जून, २०१२,
६) शासन निर्णय क्र.पीआरई-१४११/(१७५/११)/प्राशि-५, दि. २७ जुलै, २०१२,
७) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे पत्र क्र.मराशैसंप्रप/अविवि/अ.पु./२०१२/३४५४, दि. १४/१२/२०१२.

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ मधील शैक्षणिक तत्त्वांच्या अनुरोधाने महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० तयार करण्यात आलेला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार दिनांक ७ मार्च, २०१२ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे या संस्थेस विद्याविषयक प्राधिकरण म्हणून विनिर्दिष्ट करण्यात आलेले आहे. या अधिसूचनेनुसार विद्याविषयक प्राधिकरणावर अभ्यासक्रम व मूल्यमापन पद्धती निश्चित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासंदर्भात शासनाच्या दिनांक २७ जुलै, २०१२ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय अभ्यासक्रम पुनर्रचना समिती व विषयनिहाय अभ्यासमंडळे गठित करण्यात आलेली आहेत. शासनाच्या दिनांक २० जून, २०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या विषय योजनेनुसार राज्यस्तरीय अभ्यासक्रम पुनर्रचना समिती व विषयनिहाय अभ्यासमंडळाने तयार केलेल्या पुनर्रचित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २०१२ (इ. १ ली ते ८ वी) च्या मसुद्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२००५ नुसार प्राथमिक शिक्षण (इ. १ ली ते ८ वी) अभ्यासक्रम पुनर्रचनेसाठी राज्यस्तरीय समिती व विषयनिहाय अभ्यासमंडळांनी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० नुसार तसेच राज्याच्या गरजा

व परंपरा लक्षात घेऊन शासनाच्या दि. २० जून, २०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या विषय योजनेनुसार पुनर्रचित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम–२०१२ (इ.१ ली ते ८ वी) च्या पुढील मसुद्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ (इ.१ ली ते ८ वी) अंतर्गत विषयनिहाय अभ्यासक्रम**

| भाषा भाग–१ | भाषा भाग–२ | भाषेतर भाग–१ | भाषेतर भाग–२ |
|---|---|---|---|
| मराठी (प्रथम भाषा)<br>इ. १ ली ते ८ वी | मराठी (द्वितीय भाषा)<br>इ. १ ली ते ८ वी | गणित –<br>इ. १ ली ते ५ वी | गणित –<br>इ. ६ वी ते ८ वी |
| हिंदी (द्वितीय भाषा) संपूर्ण<br>इ. ५ वी ते ८ वी | मराठी (संयुक्त)<br>इ. ५ वी ते ८ वी | परिसर अभ्यास भाग–१<br>इ. ३ री ते ५ वी | सामान्य विज्ञान<br>इ. ६ वी ते ८ वी |
| इंग्रजी (तृतीय भाषा)<br>अनिवार्य – इ. १ ली ते ८ वी | हिंदी (प्रथम भाषा) –<br>इ. १ ली ते ८ वी | परिसर अभ्यास भाग–२<br>इ. ३ री ते ५ वी | इतिहास, ना.शास्त्र<br>इ. ६ वी ते ८ वी |
| | हिंदी संयुक्त<br>इ. ५ वी ते ८ वी | कार्यानुभव<br>इ. १ ली ते ५ वी | भूगोल<br>इ. ६ वी ते ८ वी |
| | इंग्रजी (प्रथम भाषा)<br>इ. १ ली ते इ. ८ वी | कलाशिक्षण<br>इ. १ ली ते ५ वी | कार्यानुभव<br>इ. ६ वी ते ८ वी |
| | संस्कृत (संपूर्ण/संयुक्त)<br>इ. ८ वी | शारीरिक शिक्षण<br>इ. १ ली ते ५ वी | कलाशिक्षण<br>इ. ६ वी ते ८ वी |
| | | | शारीरिक शिक्षण<br>इ. ६ वी ते ८ वी |

**अन्य माध्यमे–भाषा अभ्यासक्रम (इ. १ ली ते ८ वी)**

- उर्दू (प्रथम भाषा) – इ. १ ली ते ८ वी
  उर्दू (संयुक्त) – इ. ५ वी ते ८ वी
- गुजराती (प्रथम भाषा) – इ. १ ली ते ८ वी
  गुजराती (संयुक्त) – इ. ५ वी ते ८ वी
  गुजराती (द्वितीय भाषा) – संपूर्ण – इ. ८ वी
- कन्नड (प्रथम भाषा) – इ. १ ली ते ८ वी
  कन्नड (संयुक्त) – इ. ५ वी ते ८ वी
- सिंधी (प्रथम भाषा) – इ. १ ली ते ८ वी
  सिंधी (संयुक्त) – इ. ५ वी ते ८ वी
- तेलुगू (प्रथम भाषा) – इ. १ ली ते ८ वी
  तेलुगू (संयुक्त) – इ. ५ वी ते ८ वी

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२१२२८१४३६०३१७२१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ना. ऊ. रौराळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा. मंत्री (शा.शि.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (शा.शि.) यांचे खाजगी सचिव,
मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई,
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),
सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती–प्राशि–५.

# परिशिष्ट - ७

## विषयनिहाय - अभ्यासक्रमाचे समीक्षण करणाऱ्या विशेष तज्ज्ञांची सूची

| अ. क्र. | विषयाचे नाव | तज्ज्ञ व्यक्तीचे नाव |
|---|---|---|
| १. | मराठी (प्रथम भाषा) | श्री. वसंत डहाके, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन |
| २. | हिंदी | डॉ. रामजी तिवारी, सेवानिवृत्त विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ |
| ३. | इंग्रजी | श्री. के. एम. वाकणकर, माजी अभ्यास मंडळ सदस्य,<br>एस. एस. सी. बोर्ड, पुणे |
| ४. | गणित | डॉ. हेमचंद्र प्रधान, माजी संचालक, डॉ. होमी भाभा विज्ञान शिक्षण संस्था, मुंबई |
| ५. | विज्ञान | डॉ. अनिल काकोडकर, अध्यक्ष, राजीव गांधी विज्ञान व<br>तंत्रज्ञान शिक्षण आयोग, मुंबई |
| ६. | परिसर अभ्यास | डॉ. जयश्री रामदास, संचालक, डॉ. होमी भाभा विज्ञान शिक्षण संस्था, मुंबई |
| ७. | कार्यानुभव -<br>माहिती व संप्रेषण<br>तंत्रज्ञान | डॉ. विजय भटकर, अध्यक्ष, आयआयटी, दिल्ली<br>श्रीमती हेमा धोत्रे, पी. ई. एस. मॉडर्न गर्ल्स हायस्कूल, शिवाजीनगर,<br>पुणे ५. |
| ८. | इतिहास, ना. शास्त्र | डॉ. राजा दीक्षित, विभागप्रमुख, आंतरप्रणाली अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे |
| ९. | भूगोल | डॉ. श्रीकांत कार्लेकर, भूगोल विभागप्रमुख, स. प. महाविद्यालय, पुणे |
| १०. | कला | श्रीम. शर्वरी जमेनिस - नृत्यांगना<br>डॉ. माधुरी जोशी - गायिका<br>श्री. विवेक खटावकर - शिल्पकार<br>श्री. मिलिंद प्रताप मुळीक - चित्रकार |
| ११. | शारीरिक शिक्षण | डॉ. घरोटे, मन्मथ संचालक, कैवल्यधाम योग संस्था, लोणावळा,<br>जि. पुणे. |
| १२. | संस्कृत | श्रीमती अश्विनी यार्दी. प्राध्यापिका सरस्वती भवन विज्ञान महाविद्यालय,<br>औरंगाबाद.<br>श्रीमती हेमा डोळे- मानद प्राध्यापक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. |

# विशेष सहकार्य

- श्री. विद्याधर शुक्ल, सेवानिवृत्त उपसंचालक,
  महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०.
- श्री. उदयसिंह भोसले, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सातारा.
- श्री. एन. बी. निकम, अधिव्याख्याता, अभ्यासक्रम विकसन विभाग
- श्री. एस. एम. गावडे, विषय सहायक,
  अभ्यासक्रम विकसन विभाग
- श्रीमती एस. पी. वनारसे, लघुलेखक,
  अभ्यासक्रम विकसन विभाग
- श्री. निखिल कदम, कनिष्ठ लिपिक,
  अभ्यासक्रम विकसन विभाग
- श्री. विशाल राऊत, कनिष्ठ लिपिक,
  अभ्यासक्रम विकसन विभाग
- श्रीमती मीना महाशब्दे, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका, पुणे.
- श्रीमती नंदा कुलकर्णी, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका, पुणे.
- श्रीमती मंगला राहणे-हकीम, सेवानिवृत्त तंत्रसहायक,
  प्रकाशन विभाग, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०.